सरतपासणी श्री. वानखडे वकील अर्जदार तर्फे:–

६. आता मला माझे शपथपत्र नि.क्र. यु– ५ दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल जन माहिती अधिकारी यांनी दि.०४/०२/२०२२ रोजी मी दिलेल्या अर्जानुसार माहिती पुर्वीत असल्याबाबत दिलेले पत्र दाखविले त्यास **नि.यु.६** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल जन माहिती अधिकारी यांनी दि.०६/०१/२०२२ रोजी मला दिलेले पत्र दाखविले त्यास **नि.यु.७** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मला जन माहितीच्या पत्राअंतर्गत मिळालेले माझे उपदानाचे बिल दाखविले त्यास **नि.यु. ८** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मला जन माहितीच्या पत्राअंतर्गत मिळालेले माझे हजेरी पत्रकाचे विवरणाची प्रत दाखविली त्यास **नि.यु. ९** देण्यात येते.

७. उलटतपासणी श्री. देशपांडे वकील गैरअर्जदार तर्फे:–

हे म्हणणे खरे आहे की, उपदानाची रक्कम मिळण्याकरीता २४० दिवस काम करणे गरजेचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, उपदानाची रक्कम मिळालेली आहे. साक्षदार स्वत: सांगतो की मला उपदानाची रक्कम कमी मिळालेली आहे. मला उपदानाची रक्कम कमी मिळाली हे मला माहितीच्या अधिकारात कागदपत्र मिळाल्यानंतर समजली. मी दि. ३१/०७/२०२१ रोजी सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुराव्यामध्ये माझी उपदानाची रक्कम कशी कमी मिळाली याबाबत नमुद केलेले नाही. हे मला माहिती नाही की माझे पुरावामध्ये मी उपदानाची फरकाची

रक्कम कशी काढली याबाबत नमुद केलेले नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपासणी पुर्ण.

फेर तपासणी नाही.

माझे समक्ष

स्वाक्षरी
(श्रीमती रू.वि. मेटे)

यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. २१.०६.२०२४.